# घरांखालून मेट्रोसाठी भुयार

## धारावी स्थानकाचे ८२ टक्के काम पूर्ण

म. टा. खास प्रतिनिधी



### ...तरीही वाहतूक सुरू

धारावी हे स्थानक माहीम-सायन लिंक रोडवर धारावी खारफुटी बगिच्याजवळ उभे केले जात आहे. पूर्वेकडे दाटीवाटीची वस्ती, उत्तरेकडे कायम वर्दळीचा लिंक रोड व पश्चिमेकडे खारफुटी संरक्षित क्षेत्र, या तिन्हीचा समतोल साधून हे स्थानक उभे केले जात आहे. जमिनीवर प्रचंड वाहतूक सुरू असतानाही जमिनीखाली हे स्थानक उभे केले जात आहे.

**मुंबई :** लोकसंख्येने भरगच्च असलेल्या व दाटीवाटीच्या घरांखाली भुयारी स्थानक उभे करण्याचे काम मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) केले आहे. कुलाबा ते आरे- मेट्रो ३ या भूमिगत मार्गिकेसाठीचे धारावी स्थानक जवळपास ८२ टक्के पूर्ण झाले आहे.

मेट्रो ३ ही मार्गिका मुंबईच्या पश्चिम उपनगरांना उत्तर-दक्षिण जोडणारी असेल. उत्तरेकडे सारिपूतनगर (आरे) ते दक्षिणेकडे कफ परेडपर्यंत ही २७ स्थानकांची मार्गिका आहे. मार्गिकेतील पहिला टप्पा आरे ते बीकेसी असा आहे. डिसेंबर, २०२३पर्यंत हा टप्पा सुरू करायचा असल्याने त्याची तयारी जोरात सुरू आहे. या मार्गिकेचा दुसरा टप्पा डिसेंबर २०२४मध्ये सुरू होणार आहे. या दुसऱ्या टप्प्यातील पहिले स्थानक धारावी आहे. हे स्थानक उभारण्याचे काम आव्हानात्मक आहे.

मेट्रो ३ ही मार्गिका 'एमएमआरसी' उभी करीत आहे. 'एमएमआरसी'नुसार, स्थानकाची उभारणी ८२ टक्के तर प्रणालीशी संबंधित कामे ५४ टक्के पूर्ण झाली आहेत. धारावी स्थानकापासून ते कफ परेडपर्यंतची मार्गिका डिसेंबर २०२४मध्ये सुरू केली जाणार आहे. परंतु धारावी स्थानकाची उभारणी याचवर्षी पूर्ण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.